## आदेश निशाणी क्रमांक १९ वर पारित

१) प्रस्तुत अर्ज प्रतीवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ७ नियम ११, आदेश २ नियम २ तसेच कलम १० व ११ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रतीवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी यापुर्वी प्रस्तुत दाव्यातील मागणी करीता दिवाणी दावा क्र. ६४/२००२ दाखल केला होता व सदरील दाव्यात दिनांक ०४/१२/२००८ रोजी न्यायनिर्णय झालेला आहे. म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील वाद प्रश्न यापुर्वीच्या दाव्यात निकाली काढलेले असल्यामुळे प्रस्तुत दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २ नियम २ तसेच कलम १० व ११ ची बाधा येते.

२) तसेच वादीच्या पुर्वीच्या दाव्यास सन २००२ मध्ये वाद कारण घडलेले होते. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील मागणी करीता, वाद कारणापासुन तीन वर्षाच्या आत प्रस्तुत दावा दाखल करणे आवश्यक होते. म्हणुन प्रस्तुत दाव्यास मुदत कायद्याची बाधा येते. त्यामुळे सदरील दावा उपरोक्त तरतुदीसह दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) प्रमाणे खारीज करण्याची विनंती प्रतीवादी यांनी केलेली आहे.

३) प्रस्तुत अर्जास वादी यांनी नि. क्र. २१ अन्वये खुलासा दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यामध्ये वादीच्या म्हणण्याप्रमाणे पुर्वीच्या दाव्यातील व

प्रस्तुत दाव्यातील पक्षकार हे भिन्न आहे. तसेच प्रस्तुत दाव्यातील वाद प्रश्न पुर्वीच्या दाव्यात निर्णित झालेले नाहीत. तसेच प्रस्तुत दाव्याचे वाद कारण देखील भिन्न आहे. म्हणुन सदरील अर्ज नामंजुर करण्याची विंनती केलेली आहे.

४) प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील लेखी खुलासा तसेच अभिलेखावरील सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५) प्रस्तुत दाव्यातील वाद कथनांचा विचार केला असता, वादीच्या म्हणण्याप्रमाणे वाटपा आधारे दावा मिळकत त्यांना मिळालेली आहे व तेव्हा पासुन सदरील दावा मिळकत त्यांच्या कब्जे व उपभोगात आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या कब्जे व उपभोगास प्रतीवादी हे विनाकारण हरकत अडथळा करतात म्हणुन, त्यांनी दावा मिळकतीचा ताबा कायम ठेऊन मालकी हक्क जाहीर करुन मिळण्याची तसेच दावा मिळकतीस हरकत अडथळा करुन नये म्हणुन प्रतीवादीं विरुध्द कायम मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

६) याउलट प्रतीवादी यांनी वादीचा वाद मिळकती मधील हिस्सा मान्य केलेला आहे. परंतु सदर दोन्ही पक्षकारांमध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमे बाबत महत्वाचा वाद आहे. तसेच प्रस्तुत अर्जातील प्रतीवादी यांच्या आक्षेपाच्या अनुषंगाने वादीने यापुर्वी दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र. ६४/२००२ च्या न्यायनिर्णयाचे

अवलोकन केले असता, यापुर्वी देखील वादी यांनी प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकती बाबत मालकी हक्क जाहिर करुन मिळण्यासाठी व कायम मनाई हुकूमासाठी दावा दाखल केला होता. सदरील पुर्वीच्या दाव्यात प्रस्तुत दाव्यातील प्रतीवादी क्र.२ हा पक्षकार नव्हता. परंतु प्रतीवादी क्र. १ व सदर दोन्ही प्रतीवादींचे आई–वडिल हे इतर प्रतीवादींसह पक्षकार होते. तसेच पुर्वीच्या दाव्यातील वाद मिळकत व प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत या देखील एकच आहे.

७) तसेच सदर पुर्वीच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांच्या एकूण मिळकती पैकी वादीचा अर्धा हिस्सा हक्काबाबतचा वाद प्रश्न निकाली निघालेला आहे व त्याप्रमाणे पुर्वीच्या दाव्यातील एकूण मिळकती पैकी वादीचा अर्धा हिस्सा मान्य झालेला आहे. परंतु सदर पुर्वीच्या दाव्यात वादीस दावा मिळकतीवरील कब्जा सिध्द करता आला नाही, म्हणुन वादीची मनाई हुकूमाची मागणी नाकारण्यात आलेली आहे. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ चे अवलोकन केले असता, दोन्ही पक्षकारांमधील एकाच वाद मिळकती बाबतचे वाद प्रश्न पुर्वीच्या दाव्यात गुणवत्तेवर निकाली निघालेले असतील तर, त्याच पक्षकरांमध्ये त्याच वाद मिळकती बाबत त्याच वाद प्रश्नाबाबत नव्याने दाव्याची संपरिक्षा चालविण्यास सदरील कलमा अधारे बाधा येते.

८) सदरील कायदेशीर तरतुदीच्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्याचा विचार केला

असता, पुर्वीच्या दाव्यातील व प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत एकच आहे. तसेच प्रस्तुत दाव्यातील प्रतीवादी क्र.२ हे पुर्वीच्या दाव्यात पक्षकार नसले तरी, सदरील दाव्यातील वाद मिळकतीच्या अनुषंगाने सदर प्रतीवादीचे आई–वडिल व प्रतीवादी क्र.१ हे पुर्वीच्या दाव्यात पक्षकार होते. परंतु पुर्वीच्या दाव्यातील न्यानिर्णयाचे अवलोकन केले असता, वादीने ज्या चतुःसिमेच्या आतील वाद मिळकती बाबत मालकी हक्क घोषित करुन मागितला होता, त्याच चतुःसिमेच्या आतील जमीनीवर वादीचा मालकी हक्क घोषित करुन मिळालेला नसल्याचे प्रथमदर्शी दिसुन येते.

९) तसेच सर्वात महत्वाची बाब म्हणजे एखाद्या दाव्यात दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ बाबत वाद असेल तर, सदरील वाद प्रश्न इतर वाद प्रश्नांसोबत सविस्तर साक्ष पुराव्यानंतर, दाव्याच्या अंतीम सुनवणी वेळी गुणवत्तेवर निकाली काढणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील सुनावणीच्या याटप्यावर म्हणजेच, प्रस्तुत दाव्यात पुराव्या पुर्वी सदरील कलम ११ बाबतच्या वाद प्रश्नावर आदेश पारीत करणे योग्य नाही. तसेच पुर्वीच्या दाव्यातील मनाई हुकूमाच्या मागणीचा विचार केला असता, पुर्वीच्या वाद कारणानुसार सदरची मागणी नामंजुर झालेली आहे. परंतु प्रस्तुत दाव्यातील मनाई हुकूमाची मागणी ही पुर्वीच्या वाद कारणानुसार दाखल केलेली नसुन, प्रस्तुत दाव्यातील मनाई हुकूमाची मागणी दिनांक २०/०६/२०१९ रोजीच्या वाद कारणानुसार दाखल केलेली आहे.

त्यामुळे वाद कारण वेगळे असल्यामुळे सदर मागणी बाबत देखील कलम ११ चा आक्षेप सुनावणीच्या याटप्प्यावर विचारात घेता येणार नाही.

**१०)** तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) च्या आक्षेपाबाबत विचार केला असता, प्रस्तुत दाव्यात वादीच्या दोन प्रमुख मागण्या आहेत व त्या म्हणजे मालकी हक्क जाहिर करणे व मनाई हुकूम मंजुर करणे. सदरील दोन्ही मागण्यांपैकी मनाई हुकूमाच्या मागणीबाबत वादीने दिनांक २०/०६/२०१९ रोजी वाद कारण घडलेले असल्याचे नमुद केलेले आहे व सदरील दावा दिनांक ०४/०७/२०१९ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे मनाई हुकूमाच्या मागणी बाबत सदरील दावा मुदतीत नाही असे म्हणता येणार नाही. तसेच मालकी हक्काच्या मागणी बाबत मुदतीचा विचार केला असता, सदरील वाद मुद्दा दाव्याच्या अंतिम सुनावणी वेळी निकाली काढण्यात येईल. तसेच सर्वात महत्वाची बाब म्हणजे आदेश ७ नियम ११ प्रमाणे वाद पत्रातील फक्त काही भाग नाकारता येत नाही. त्यामुळे वादीची मनाई हुकूमाची मागणी मुदतीत आहे व इतर मागणी बाबत नियमाप्रमाणे वाद पत्र सदर कलमाप्रमाणे नाकारता येत नाही. म्हणुन वादीच्या प्रस्तुत दाव्यास आदेश ७ नियम ११ ची बाधा येत नाही.

**११)** तसेच आदेश २ नियम २ च्या आक्षेपाबाबत विचार केला असता, एखाद्या वाद कारणाच्या संबंधात वादी जी हक्क मागणी करण्यास हक्कदार असेल

तर, ती संपुर्ण हक्क मागणी एकाच दाव्यात समाविष्ट असणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत दाव्याचा विचार केला असता, वादीच्या पुर्वीच्या दाव्यातील वाद कारण व प्रस्तुत दाव्यातील वाद कारण हे भिन्न असल्यामुळे प्रस्तुत दाव्यास आदेश २ नियम २ ची बाधा येत नाही, असे प्रथमदर्शी दिसुन येते.

**१२)** तसेच कलम १० च्या आक्षेपाबाबत विचार केला असता, दोन्ही पक्षकारांमधील पुर्वीचा दावा प्रलंबित नसल्यामुळे प्रस्तुत दाव्यास सदर कलमाची बाधा येत नाही. एकंदरीत वरील कारण मिमांसेचा विचार केला असता, प्रस्तुत दाव्याचे वाद कारण हे वेगळे व भिन्न असल्यामुळे सदरील दावा मुदतीत आहे. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ बाबतचा वाद प्रश्न नियमाप्रमाणे सुनावणीच्या या टप्प्यावर निकाली काढणे योग्य नाही. त्यामुळे वरील कारण मिमांसेचा विचार केला असता, प्रस्तुत अर्ज नामंजुर करणे योग्य आहे.

करीता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## // आदेश //

प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by BHARAT SANTARAM JAGDALE
Date: 2022.01.31 15:32:22 +0530

ठिकाण :– भोकरदन.
दिनांक :– २९/०१/२०२२.

(भरत सं. जगदाळे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ संचकेतील प्रत्येक शब्द नि शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

कनिष्ठ लिपीक :– एस.डि. शिंदे

न्यायालयाचे नांव :– सह दिवाणी न्यायालय , भोकरदन

पी.डी.एफ. दिनांक :– २९/०१/२०२२

स्वाक्षरित/–

क.लिपीक